समरी क्रि.के.नं.          /२०२६

**मे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारीसो, कागल**

Exh. 4/C

**यांचे कोर्टात ....**

**विलास केशव पाटील** ........ फिर्यादी

विरूद्ध

**विद्या विजयकुमार पाटील** ......... आरोपी

## व्हेरिफिकेशन

ORDER
Before me

J.M.F.C
20.04.26

मी यातील फिर्यादी श्री. विलास केशव पाटील, व.व.५२, धंदा : शेती, रा. माद्याळ, ता. कागल, जि. कोल्हापूर शपथपूर्वक ॲफिडेव्हीट करतो की,

१) माझे व आरोपी यांचे सासरे कै. श्रीपती काशिबा पाटील व आरोपी यांचे कुटुंबाचे मैत्रीचे संबंध होते व आहेत. सदरचे मैत्रीचे संबंधामुळे माझे व आरोपी यांचे जिव्हाळ्याचे संबंध निर्माण झाल्याने घरी येणे–जाणे होते व आहे.

२) यातील आरोपी यांनी माझेकडे कौटुंबिक अडचणीकरीता व आत्मगरजेपोटी व मुलांचे शिक्षणाकरीता माझेकडे हातउसणे रोख रक्कम रू. ४,५०,०००/– (अक्षरी रक्कम रू. चार लाख पन्नास हजार फक्त) ची मागणी केली. आरोपी यांचे मागणीनुसार मला आरोपी यांना वेळोवेळी रोख रक्कम रू. रक्कम रू. ४,५०,०००/– (अक्षरी रक्कम रू. चार लाख पन्नास हजार फक्त) दिलेले आहेत. सदरची रक्कम आरोपी यांनी मला दोन महिन्याचे मुदतीत परत करणेची हमी दिलेली असून सदर व्यवहाराचे मोबदल्यात राजे विक्रमसिंह घाटगे को–ऑप. बॅक लि. कागल, शाखा – लक्ष्मीपुरी, कोल्हापूर या बॅकेचा दि.२९/१२/२०२५ इ. रोजी चेक नं. ०१२३७० व चेक नं. ०१२३७१ असे दोन चेक दिलेले आहेत. सदरची

Assit. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

रक्कम रोख स्वरूपात न दिलेस सदरचे दोन्ही चेक बॅकेत भरून आरोपी यांनी मला चेकची रक्कम वसुल करून घेणेची हमी दिलेली आहे.

३) मी आरोपी यांचेकडे वर नमूद दिले पैशांची मुदतीनंतर वेळोवेळी मागणी केली असता आरोपी यांनी मला रक्कम रू. ४,००,०००/— (अक्षरी रक्कम रू. चार लाख फक्त) चे दोन चेक बॅकेत भरून पैसे घेणेस सांगितले व उर्वरित रक्कम रू. ५०,०००/— (अक्षरी रक्कम रू. पन्नास हजार फक्त) नंतर देतो असे सांगितले. मी सदरचे दोन्ही चेक माझे एच.डी.एफ. सी. शाखा — मुरगूड येथे खातेवर दि.२९/१२/२०२५ इ. रोजी भरले असता सदर दिवशी **'फंड्स इनसफिशिएंट'** या शे—यानिशी न वटता परत आले आहेत. म्हणून मी सदरचे चेक न वटता परत आलेची आरोपी यांना कल्पना दिली असता आरोपी यानी मला सदरची रक्कम आज देतो, उद्या देतो असे म्हणून देणेस टाळाटाळ सुरू केलेली होती व आहे. त्यामुळे आरोपी यांनी माझे कायदेशीर देय असणारे पैसे देणेस टाळाटाळ करीत आहात याची खात्री मला झालेली आहे.

४) त्यानंतर, मी माझे वकीलांमार्फत सदरचा चेक अनादर झालेबाबतची कायदेशीर देय असणारी नोटीस दि.०१/०१/२०२६ इ. रोजी आरोपीस पाठवली. सदरची नोटीस आरोपी स्विकारत नसल्याने **'अनक्लेम्ड'** या शे—यानिशी दि. १२/०१/२०२६ इ. रोजी परत आली आहे. वरील चेकपोटीची देय असणारी रक्कम देणेची जबाबदारी कायद्याने आरोपीवर होती व आहे. त्यामुळे आरोपी हा माझी कायदेशीर देय असणारी रक्कम देणार नाही अशी मला खात्री झालेली आहे. त्यामुळे मला आरोपीविरूद्ध सदरची फिर्याद दाखल करणे भाग पडले आहे.

५) यातील आरोपी यांनी माझेकडून कौटुंबिक अडचणीकरीता व आत्मगरजेपोटी, मुलांच्या शिक्षणासाठी हातउसणे पैसे घेवून जावून सदर रक्कमेच्या परतफेडीपोटी खोटा, बनावट चेक देवून माझी फसवणूक करून घोर स्वरूपाचा गुन्हा केलेला आहे.

Asslt. Supdt.
Civil Court Jr. Dn., Kagal

६) **सबब माझी विनंती की,**

आरोपी यांनी माझेकडून कौटुंबिक अडचणीकरीता व आत्मगरजेपोटी, मुलांच्या शिक्षणासाठी हातउसणे पैसे घेवून जावून त्या मोबदल्यात न वटणारा खोटा व बोगस चेक देवून माझी घोर फसवणूक केली असलेने आरोपीस जास्तीत जास्त दंड व शिक्षा व्हावी व दंडाचे रक्कमेतून मला फिर्यादीची कायदेशीर देय असणारी रक्कम अगर चेकची रक्कम देणेबाबत योग्य ते आदेश व्हावेत ही नम्र विनंती.

म्हणून केले व्हेरिफिकेशन.

वि. के. पाटील

कागल
दि.०२/०२/२०२६

**ॲफिडेव्हिट**

मी यातील फिर्यादी श्री. विलास केशव पाटील, व.व.५२, धंदा : शेती, रा. माद्याळ, ता. कागल, जि. कोल्हापूर शपथपूर्वक ॲफिडेव्हिट करतो की, वरील व्हेरिफिकेशनमधील संपूर्ण मजकूर माझे स्वत:चे माहितीप्रमाणे, समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे. म्हणून केले ॲफिडेव्हिट. आज मु।। कागल
दि.०२/०२/२०२६

मी फिर्यादी यांना ओळखतो

Gaikwad

वि. के. पाटील

ॲड. ए. जे. गायकवाड–पाटील

**प्रतिज्ञा**

मी यातील फिर्यादी विलास केशव पाटील सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की, वरील व्हेरिफिकेशनमधील संपूर्ण मजकूर खरा व बरोबर आहे. म्हणून केली प्रतिज्ञा. आज मु।। कागल दि.०२/०२/२०२६

वि. के. पाटील

Solemnly Affirmed before me by
Shri विलास केशव पाटील
Age ५२ of माद्याळ ता. कागल who is
identified by Shri वकील A J गायकवाड-पाटील
............whom I know personally
Dated :- 02/02/2026

Assistant Superintendent

PRANITA SUHAS PATIL
Digitally signed by PRANITA SUHAS PATIL
Date: 2026.04.20 16:03:54 +0530